C. S. (Main) Exam : 2011

D-DTN-L-NSB

MARATHI

Paper II

(Literature)

Time Allowed : Three Hours | *Maximum Marks : 300*

INSTRUCTIONS

Candidates should attempt questions no. 1 and 5 which are compulsory, and any THREE of the remaining questions, selecting at least ONE question from each Section.

The number of marks carried by each question is indicated at the end of the question.

Answers must be written in Marathi.

SECTION A

1. पुढील चार उताऱ्यांचे रसास्वादपूर्वक सटीक स्पष्टीकरण करा : *15×4=60*

(a) पंडिता आजिलागौनि तुज गीत गावेया अनुज्ञा गा : गोसावीं म्हणितलें असे : ये भींती विकारु होआवा तरि देमतीये गीत गातां (विकारु) होआवा :

(b) यावरून सद्‌गुण व दुर्गुण हे कांहीं पिढीजादा स्वभाव नाहींत. कारण सद्‌गुणी बृहस्पतिसारख्या मानवांची मुलें स्वभावानें कधीं कधीं सद्‌गुणी निपजत नाहींत. त्याचप्रमाणें धूर्त आर्य भट्टांचीं मुलें नेहमीं शंकराचार्याच्या तोलाची सद्‌गुणी निपजत नाहींत.

Optional Province · optionalprovince.com

(c) अंथरुणावर पडल्या पडल्या आम्हीं मनांतल्या मनांत नमस्कार घातले न् काय थोडे थोडके घातले नाहींत बरं ! चांगले हजार नमस्कार घातले हजार ? पण आपले अगदीं मनांतल्या मनांत ?

(d) बाकीचं पोट आम्ही पाण्यानं भरून काढतो. पोटभर जेवण आमच्या वाट्याला नसतंच कधी ! असलं तरी क्वचित, आज अपुरंच झालं.

2. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. *30×2=60*

(a) महात्मा जोतिराव फुले यांनी शेतकऱ्यांच्या समस्यांचा नेमका परामर्श 'शेतकऱ्याचा असूड' मधून कसा घेतला आहे ?

(b) 'सार्वजनिक सत्यधर्म' या ग्रंथनिर्मिच्या प्रेरणा तत्त्कालीन समाजव्यवस्थेत दडलेल्या होत्या, चर्चा करा.

3. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. *30×2=60*

(a) 'ब्राह्मणकन्या' या कादंबरीतून प्रकट झालेल्या स्त्रीजीवनचित्रणाचे स्वरूप स्पष्ट करा.

(b) 'जन हे ओळतु जेथे' या कादंबरीतून व्यक्त झालेल्या विचारांचा परामर्श घ्या.

4. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. *30×2=60*

(a) 'एकेक पान गळावया' या पुस्तकातून व्यक्तिवादी दृष्टीचा आविष्कार झाला आहे. – चर्चा करा.

(b) संयत आणि संवेदनशील मनाचा प्रत्यय 'आठवणींचे पक्षी' आत्मकथनातून येतो, उहापोह करा.

Optional Province · optionalprovince.com

SECTION B

5. पुढील चार पद्यखंडाचे रसास्वादपूर्वक सटीक स्पष्टीकरण करा : *15×4=60*

(a) मंदाकिनीमधिल जीं कनकारविंदें ।
तीं जेवितों मृदुलनालमृणालकंदें ।
आम्ही असों नृपसुते तरि कांचनाचे ।
जें कार्य तें धरिल कीं गुण कारणाचे ।।

(b) जगीं सांगतात प्रीत पतंगाची खरी ।
झड घालुन प्राण देतो दीपकाचे वरी ।
हे मी सांगत असतांना कांगे पडले भरी ।
रत्न टाकून पदरांत गार घेऊं नकोरे ।।

(c) हृदयाची गुंतागुंत कशी उकलावी ?
ही तीव्र वेदना मनामनाची ठावी.
अंधार दाटला अपार भरला पूर,
परि पार तयाच्या कोण मला नेणार ?

(d) संदिग्ध घरांच्या ओळी
आकाश ढवळतो वारा
माझ्याच किना-यावरती
लाटांचा आज पहारा.

6. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. *30×2=60*

(a) नामदेवांच्या व्यक्तिमत्त्वाचे निर्मळ प्रतिबिंब त्यांच्या अभंगवाणीतून कसे पडले आहे ? ते सांगा.

(b) मराठी लावणीवाङ्मयाचे विशेष 'पैंजण' च्या आधारे विशद करा.

Optional Province · optionalprovince.com

7. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. *30×2=60*

(a) 'विशाखा' मधून व्यक्त झालेल्या राष्ट्रभावनांचा परामर्श घ्या.

(b) विंदा करंदीकरांची कविता सतत नाविन्याचा शोध घेत राहिली, 'मृद्‌गंध' च्या आधारे स्पष्ट करा.

8. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. *30×2=60*

(a) नारायण सुर्वे यांनी 'जाहिरनामा' मधून रेखाटलेले जीवनविश्व वेगळ्या प्रकारचे कसे आहे, ते सांगा.

(b) सामाजिकतेच्या पलिकडे जाऊन मानवी अस्तित्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न नामदेव ढसाळांची कविता करते – 'या सत्तेत जीव रमत नाही' च्या आधाराने स्पष्ट करा.

Optional Province · optionalprovince.com